"यशवंतराव चव्हाण भवन"
पुणे जिल्हा परिषद, माध्य. शिक्षण,
जा.क्र./शिक्षण/माध्य/अनुदान/ह /८९-९०
पुणे-११. दिनांक :-२१ ऑगस्ट,१९८९

BOOK-POST.

प्रति,
मुख्याध्यापक,
एच. एस. एस. धपस्कुल
श्रीधरनगर, चिंचवड पुणे-33.

विषय :- शासनमान्य विनाअनुदानित पात्र माध्यमिक शाळांना [इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त] अनुदान मंजूर करणेबाबत.

संदर्भ :- १]शासन निर्णय क्रं.एसएसएन/१०८८/१६६९-एन/माशि-१
दिनांक १०.३.१९८९
२]शिक्षण संचालनालयाचे क्रं. अमाशा १०८८/३२०३७/१५ क, दिनांक २४.२.८९ चे परिपत्रक.
३]शिक्षण संचालनालयाचे क्रं. अमाशा १०८९/३२०३७/१५ क, दिनांक १७.८.८९ चे परिपत्रक.

. . . . .

उपरोक्त संदर्भ क्रं. १ नुसार दि. १.१०.१९८८ ते दि. २८.२.१९८९ या कालावधी साठी सोबत जोडलेल्या यादीतील माध्यमिक शाळांना १०० % अनुदान मंजूर करण्यात आले होते. संदर्भ क्रं. ३ नुसार आता असे कळविण्यात येत आहे की, सदर माध्यमिक शाळांना १ मार्च, १९८९ पासून मान्य तुकड्या व मान्य शिक्षक- शिक्षकेतर सेवक संख्येचे वेतन १०० % अनुदानास पात्र समजण्यात येत आहे. तरी आपण १ मार्च, १९८९ पासून आपल्याकडे सेवेत असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची नेमणूक मान्यता या कार्यालयाकडून घेऊन वेतन देयके वेतन पथकाकडे सादर करावीत. अद्यापही सेवक संख्या निश्चिती व नेमणूक मान्यता आपण घेतली नसेल तर तसे प्रस्ताव या कार्यालयास सादर करून संख्या निश्चिती व नेमणूकांना मान्यता घ्यावी व त्यानंतर वेतन देयके वेतन पथकाकडे नियमित सादर करावीत.

सेवक संख्या निश्चिती करण्यासाठी सोबत जोडलेल्या यादीमध्ये आपल्या विद्यालयात मान्य असणा-या तुकड्यांचाच विचार केला जाईल. जर आपल्या विद्यालयास या संख्येपेक्षा जास्त तुकड्या या कार्यालयाकडून मंजूर करण्यात आल्या असल्या तरी त्या तूर्त विनाअनुदान तत्वावर राहतील याची कृपया नोंद घ्यावी.

तरी कृपया वरील सूचनांचे काटे[illegible] पालन करून वेतन देयके वेतन पथकाकडे त्वरीत सादर करण्याबाबतची कार्यवाही करण्या[illegible] यावी.

स्थळ प्रतीवर मा. शि. अ. यांची सही असे.

शिक्षणाधिकारी[माध्य]
जि.प.पुणे-११. करिता

प्रत,
अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक यांना माहिती व योग्य त्या कार्यवाही स्तव अग्रेषित.

..२..

२/- संबंधित शाळांच्या वेतनावरील खर्च खाली दर्शविलेल्या अर्थ शीर्ष खाली १९८९-९० या वर्षासाठी केलेल्या तरतूदीतून भागवावा.

१] बिगर आदिवासी उपयोजन क्षेत्रातील माध्यमिक शाळा-

"२२०२ सर्वसाधारण शिक्षण- ०२ माध्यमिक शिक्षण ११० बिन सरकारी माध्यमिक शाळांना सहाय्य पंचवार्षिक योजनांतर्गत योजना [एक][बी] सर्व साधारण माध्यमिक शाळांच्या विकासासाठी सहाय्यक अनुदान [ २२०२ ०४ ८७]" मागणी क्रमांक इ-३.

२] आदिवासी उपयोजना क्षेत्रातील माध्यमिक शाळा-

"२२०२ सर्वसाधारण शिक्षण-- पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- जनजाती क्षेत्र उपयोजना- ०२-माध्यमिक शिक्षण ११० अशासकीय माध्यमिक शाळांना सहाय्य [ए] राज्य योजनांतर्गत योजना [१] जनजाती क्षेत्रात अशासकीय माध्यमिक शाळा सुरू करणे, त्यांचा विकास व विस्तार करणे, सहाय्यक अनुदान/ अर्थसहाय्य/अंशदान [२२०२ १८ ८६]" मागणी क्रमांक टी-८.

स्वाक्षरित मा. शि.अ.(मा) यांनी मान्य केली आहे.

शिक्षणाधिकारी[माध्य]
जि.प.पुणे-११. करिता

प्रत माहितीस्तव सविनय सादर,
१] मा. शिक्षण संचालक, म.रा. पुणे-१.
२].मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,पुणे-१.

## विना अनुदानित पात्र माध्यमिक शाळांची यादी.

| अ.क्रं. | माध्य. शाळेचे नांव व पत्ता | माध्यम | इयत्ता | एकूण तुकड्या |
|---|---|---|---|---|
| १. | वर्धमान विद्यालय, वालचंदनगर, ता. इंदापूर. | मराठी | ५ ते १० | ४२ |
| २. | गॅरिसन चिल्ड्रेन हायस्कूल, खडकी, पुणे. | हिंदी | ५ ते १० | ०६ |
| ३. | श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, [पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पुणे] | मराठी | ५ ते १० | १९ |
| ४. | पिंपरी-चिंचवड महानगरपालिका माध्य. विद्यालय, कासारवाडी, पुणे. | मराठी | ५ ते १० | १२ |
| ५. | पिंपरी-चिंचवड महानगरपालिका माध्य. विद्यालय, नेहरूनगर, पुणे. | मराठी | ५ ते १० | १४ |
| ६. | खडकी कॅन्टोन्मेंट बोर्ड, खडकी लोकमान्य टिळक विद्यालय, खडकी. | मराठी | ८ ते १० | ०७ |
| ७. | न्यू इंग्लिश स्कूल, धामारी, शिरूर. | मराठी | ८ ते १० | ०३ |
| ८. | अरण्येश्वर माध्यमिक विद्यालय, सहकारनगर, पुणे-९. | मराठी | ८ ते १० | ०४ |
| ९. | पिंपरी-चिंचवड महानगरपालिका माध्यमिक विद्यालय, काळभोरनगर, पुणे. | मराठी | ५ ते १० | २१ |
| १० | एम.एस.एस. हायस्कूल, श्रीधरनगर, चिंचवड, पुणे-३३. | मराठी | ५ ते १० | १० |
| ११ | प्रगती विद्यालय, हडपसर, पुणे. | मराठी | ५ ते १० | ०६ |
| १२ | भुलेश्वर माध्य. विद्यालय, माळशिरस ता. पुरंदर. | मराठी | ८ ते १० | ०३ |
| १३ | सुमंत माध्यमिक विद्यालय, पिंपरी बु. ता. खेड. | मराठी | ८ ते १० | ०३ |
| १४ | श्री दत्त विद्यालय, पिंपळखेड, ता. शिरूर. | मराठी | ८ ते १० | ०४ |
| १५ | उत्कर्ष विद्यालय, कालठण नं. १, ता. इंदापूर. | मराठी | ५ ते १० | ०६ |

स्वत:प्रत मा शि अ (मा) यांनी मान्य केली आहे.

शिक्षणाधिकारी [माध्य]
जि.प.पुणे-११. करिता.